# छत्रपती शाहू महाराजांनी स्त्री सुधारणेसाठी केलेले कायदे

**प्रा. तेजस्विनी भोसले**
कमला कॉलेज, कोल्हापूर
Email- tejaswinibhosale89@gmail.com

**प्रा. हेमंतकुमार भोसले**
कमला कॉलेज, कोल्हापूर

**प्रस्तावना**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट होती. त्याकाळात सतीची प्रथा, स्त्रीशिक्षण बंदी, विधवा विवाह बंदी, विषम विवाह, बहुपत्नीत्व, केशवपन अशा अनेक प्रकरच्या अनिष्ठ प्रथा समाजात होत्या. त्यामुळे स्त्रियांच्या जीवनात अनेक जाचक निर्बंध होते. स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांची उन्नती करण्यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले.

**शाहू महाराजांनी स्त्री सुधारणेसाठी केलेले कायदे :**

**१) कोल्हापूर इलाख्यातील विवाहसंबधी कायदा**

या कायद्याप्रमाणे विवाहाच्या वेळी पुरुषांचे वय ग्रेगोरिअन कॅलेन्डर प्रमाणे १८ वर्षाचे व स्त्रीचे १४ वर्षाचे झाले नसेल तर तिने आपला बाप अगर पालन करणारा यांची संमती विवाहास मिळवली असली पाहिजे, कोणत्याही कायद्यावरून त्यांचे लग्न गैरकायदेशीर ठरवण्यासारखा त्यांच्या नात्याचा अगर रक्ताचा परस्पर संबध असता कामा नाये. सन१९१७ चे विशेष विवाहाचे नियमाप्रमाणे विवाहाची नोंद ठेवण्यात आली. असे अनेक प्रकारचे नियम विवाह संबंधीत केले होते.

**२) विधवा पुनर्विवाह कायदा**

समाजातील अनेक जातीमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. तथापि स्वतः च्या जातीमध्ये विधवांना पुनर्विवाह तर करता येत नव्हताच शिवाय त्यांना केशवपनासारख्या अत्यंत क्रूर रूढीखाली दु : खी व उपेक्षित जीवन जगावे लगत होते.एखाद्या स्त्रीने पुनर्विवाह करण्याचे ठरवले तर समाज व कायदा यांची मान्यता करत नव्हता. १९१७ च्या जुलैमध्ये शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. या कायद्यानुसार विवाहाची नोंद करण्याची पद्धत सुरु केली गेली.

**३) पडदा पद्धतीचा निषेध**

महाराष्ट्रामध्ये उच्चवर्णीय राजघराणी, मराठा सरदार, वतनदार घराणी यांच्यामध्ये पडदा पद्धत रूढ होती. ही पद्धत स्त्रियांच्यामधील स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष दडपणारी रूढी आहे असे मत महाराजांचे होते. कुर्मी क्षत्रियांच्या सभेत त्यांनी या रुढीचा निषेध करताना म्हणाले होत्र कि, "भारतवासीय लोक उन्नतीची तीन मुख्य साधने समजतात. ती ही पहिले साधन पडदा, दुसरे विधवा विवाह निषेध व तिसरे कोणाशीही मिळून भोजन न करणे, काय आश्चर्य आहे राजमाता जिजाबाईसाहेब, कोल्हापूर राज्य संस्थापिका महाराणी ताराबाईसाहेब, महाराणी सती अहिल्याबाई, महाराणी कमलाबाई आदी करून क्षत्रिय स्त्रियांनी राज्याचा गाडाही हाकलेला आहे व रणांगणावर जाऊन शत्रूबरोबर लढल्याही. हे काम करणे पडद्याच्या आत राहून शक्य नव्हते. सध्याही पडद्याची चाल सर्व देशात नाही. मद्रास, गुजरात वगैरे प्रांतात पडदा बिलकुल नाही. दुसऱ्या प्रांतात थोड्या प्रमाणात काही जातींमध्ये पडदा पद्धत पाहावयास मिळते पडद्यामुळे स्त्रियांमधील शूरतादी गुणांचा सर्वथा नाश होतो". पडदा पद्धतीचा निषेध झाल्यामुळे स्त्रियांना बाहेर पडणे शक्य झाले.

**४) आंतरजातीय विवाह कायदा**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह शास्त्रसंमत नसल्याने बेकायदेशीर ठरवले जात. विवाह ही धार्मिक बाब मान्यता येई. धार्मिक विवाहात स्त्रियांचे शोषण होत होते. अशा शोषणाच्या विरोधी छत्रपती शाहूंनी धर्मातील

रूढींना फाटा देऊन ज्यांना नोंदणी पद्धतीने विवाह करायचा असेल त्यांना तसे कायदेशीर स्वातंत्र्य देणारा कायदा अंमलात आणला होता.

शाहू महाराजांनी पहिल्यांदाच मराठी व धनगर यांच्यात मिश्र विवाह करण्याची योजना इंदूरच्या तुकडोराव महाराजांबरोबर आखली. त्याप्रमाणे काही मिश्र विवाह घडवून आणावेत म्हणून इंदूरच्या तुकोजीराव होळकर महाराजांना लिहिलेल्या पत्रात शाहू महाराज म्हणतात, “आपण आंतरजातीय विवाहसंबंधी उत्सुकता असणाऱ्या कुटुंबामध्ये विश्वास निर्माण करावा”. त्याप्रमाणे दोन्ही राजांनी एकमेकांच्या सल्लामसलतीने १०० मिश्र विवाह करवण्याचे ठरवले होते. आंतरजातीय विवाहाची सुरुवात शाहू महाराजांनी स्वतःच्या घरापासून केली होती. महाराजांच्या कागलकर घाटगे या जनक घराण्यातील त्यांचे काका, कागलचे संस्थाधिपती काकासाहेब महाराज यांची कन्या म्हणजे महाराजांची चुलत बहिण राजकन्या चंद्रप्रभाबाई यांना तुकाडोजीराव होडकर यांचे पुत्र यशवंतराव यांना देण्याचे त्यांनी निश्चित केले. राजघराण्यातील मुलगी धनगर घराण्यात देऊन मोठी क्रांतिकारी पाऊल महाराजांनी उचलले होते.

**५) क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा**

स्त्रियांना क्रूरपणाने वागविण्याबदल शिक्षा करण्याबाबत कायदा करणे योग्य आहे असे लक्षात आल्यावर ‘स्त्रियांना क्रूरपणाने वागविण्याचे बंद करण्याबद्दल नियम’ असे नाव देऊन तारीख २ ऑगस्ट १९१९ पासून हा नियम अंमलात आणला. यासाठी काही नियम तयार केले.

छत्रपती शाहू महराजांनी पीनल कोडचा अभ्यास करून आणि भारतीय कुटुंबात स्त्रियांच्या बाबतीत घडणाऱ्या हिंसेचा परिहार करण्यासाठी या कायद्यान्वये प्रयत्न केले. स्त्रियांना क्रूरपणे वागवणे म्हणजे ‘जिच्या योगाने अयोग्य प्रकारची अनावश्यक शारीरिक दु:ख अगर पीडा उत्पन्न होते, अगर जिच्या योगाने प्रकृतीस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होण्यासाठी भीती उत्पन्न होते ती वागणूक’ यामध्ये शारीरिक मारहाणीबरोबर मानिसक छाळाचाही त्रास हा गुन्हा मनाला आहे. घालून पाडून बोलणे, टोचून बोलणे, शिव्या देणे, अपमान करणे, घरात घराबाहेर अपशब्द उच्चारणे हे सदोष वर्तन मानून स्त्रीला सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची तरतूद कायद्यात छत्रपती शाहु महाराजांनी केली.

**६) काडीमोड संबधी कायदा**

लग्नानंतर अनेक कारणांनी स्त्री-पुरुषाला काडीमोड हवा असतो. काडीमोड जात पंचायाचाचे कायदे होते. जात पंचायतीच्या या कायद्याचा पुरुषांना फायदा व स्त्रियांना तोटा होत असे. जात पंचायतीवर कोणाचे बंधन नव्हते. नियमात सुसूत्रता आणण्यासाठी स्त्रियांना त्याचा फायदा किंव्हा तो काडोमोड प्रतिकूल व्हावा यासाठी हा कायदा केला. हे कायदे करताना महाराजांनीतज्ञांचा सल्ला घेतला होता. मुंबई हायकोर्टाचे एक निवृत्त न्यायाधीश व मद्रास हायकोर्टाचे निवृत्त न्ययाधीशयांचा सल्ल्याने नियम केले होते.

छत्रपती शाहू महाराजांनी ११ जुलै १९१९ रोजी विविध जातीधार्मिंसाठी कोल्हापूरचा काडीमोड कायदा केला. विविध जातिधर्मात काडीमोड पद्धतीत असलेली ढिलाई नाहीशी करून नवरा-बायको यामधील भौतिक संबध कायद्याने सुरक्षित राखणे व समाजात नैतिक पाया मजबूत ठेवणे ही कायद्याचा उद्धेष्टी होती .

**७) जोगात्या –मुरळ्या –प्रतिबंधक कायदा**

देवाला नवस केल्यावर त्याला मुल होते अशी दृढ समजूत होती. या नवासामुळे काही आई– बापाला पहिले मुल झाले कि ते देवाला देण्याची पद्धत होतो. ते मुल मुलगी असेल तर मुरळी अगर देवदासी व मुलगा असेल तर जोगी म्हणून देवाला देत.देवाला सोडलेल्या या मुलांना अविवाहित राहावे लागे. लोकांना धर्माच्या नावावर अनाचार करण्यास संधी मिळून समजात अनीति बोकावली. या देवादिकांना सोडलेल्या जोगी- जोगीनिंच्या या प्रथा रूढ झाल्यामुळे समाजात भयंकर हिडीस स्वरूप निर्माण झाले

त्यामुळे भ्रष्टाचार वाढत होता. या परिस्थितीत महराजांनी न्याय देण्यासाठी "जोगत्या, मुरळ्या प्रतिबंधक कायदा" पास केला. या कायद्याचे उलंघन केल्यास कायद्यात जबर शिक्षा सुनावली होतो.

**८) शिमग्यातील शिव्यांना प्रतिबंध**

समाजामध्ये पुरुषांना शिव्या देण्याची खूप वाईट सवय आहे. व ती शिवी आई–बहिणीवर दिली जाते. शिवी देताना पुरुष हा पुरुषाला देत नाही तर ती एका स्त्रीला दिली जाते हे महाराजांच्या लक्षात आले आणि त्यांनी हा कायदा केला. शिमग्याच्या सणात स्त्रियांना उद्धेशून निंदा व बिमत्स भाषा वापरण्यात येते. ही चाल लाजिरवाणी आहे. हल्लीच्या सामाजिक प्रगतीच्या काळात असा प्रकार चालू देणे इष्ट नाही. या हुकुमाविरुद्ध कोणी वर्तुणूक केल्यास यावर कायद्याप्रमाणे कारवाई केली जाईल असे घोषितकेले होते.

**सारांश-**

छ. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात काही कायदे करून स्त्रियांचा विकास करण्याचे ठरविले आणि त्या दृष्टीकोनातून काही कायदे केले आणि ते अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले. स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीकोनातून हे कायदे केले होते. स्त्रियांना पुरुष इतकाच समाजात दर्जा देण्याच्या प्रयत्न केला होता. स्त्रियांच्या संरक्षणासाठी हे कायदे अत्यंत महत्त्वाचे होते.

**संदर्भ सूची-**

१) पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, जाने. २०१२.

२) पवार वसुधा ज., 'राजर्षी शाहू छत्रपती एक अभ्यास' सुमेरूप्रकाशन, कोल्हापूर, नोव्हे.२००४

३) पानसरे गोविंद, 'राजर्षी शाहू वसा आणि वारसा', नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर,२०१२.

४) संपादक कांबळे नारायण, बंलांडे, शिंदे संजय नि:राजर्षी शाहू:नव्या दिशा नवे चिंतन', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जाने.२०११

५) माने रचना, 'स्त्रीवादी संकल्पना आणि स्वरूप', अक्षर दालन, कोल्हापूर, डिसेंबर २०१३.

❑❑❑